**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक १२.०६.२०१८**

**यातील तक्रारदार व त्यांचे मित्र यांनी १ टक्के (१९३९७/- रुपये) बयाना रक्कम जमा केली होती. सदर टेंडर दुस-यास मिळालेने ती बयाना रक्कम परत मिळणेकामी <u>सत्यवान मच्छींद्र भालेराव, वय ३२ वर्ष, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद</u> यांनी १०००/- रुपयेची लाचेची मागणी करुन १०००/- रुपयेची लाच लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथील कार्यालयात स्विकारल्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही.**

--००--

तक्रारदार यांनी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, उस्मानाबाद येथे तक्रार दिली, त्याची थोडक्यात हकिगत अशी की, जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-२०१८ अंतर्गत जिल्हा परिषद, उस्मानाबाद मधील लघु पाटबंधारे विभागा मार्फत कोल्हापुर बंधारे, तलाव दुरुस्ती अंतर्गत इरला पुल वजा कोल्हापुर बंधारा दुरुस्ती करणे बाबत कामाची ई-निवीदा भरलेली होती. तसेच, सदर टेंडर भरताना १ टक्का बयाना रक्कम (१९३९७/- रुपये) व निवीदा फि ऑनलाईन भरलेली होती. परंतु, सदर टेंडर दुस-यास मिळालेने ती बयाना रक्कम परत मिळणेसाठीची कारवाई करणेकामी स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक सत्यवान भालेराव हे १०००/- रुपये लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक, डॉ.श्रीकांत परोपकारी व पोलीस उप अधिक्षक श्री. बी.व्ही.गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्री. व्ही.आर. बहिर यांनी तक्रारीची शहानिशा करुन पोलीस निरिक्षक श्री. आघाव व ला.प्र. वि. उस्मानाबाद टीमच्या सहाय्याने सापळा रचून आज दिनांक १२.०६.२०१८ रोजी **सत्यवान मच्छींद्र भालेराव, वय ३२ वर्ष, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद** यांनी १०००/- रुपयेची लाच त्यांचे कार्यालयात स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेतले असुन त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास **श्री.व्ही.आर.बहिर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद** हे करीत आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद कार्यालयाशी मोबाईल, दूरध्वनीवर व टोल फ्री क्रमांकावर ए.सी.बी.विभागाचे मोबाईल ॲप्सव्दारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा असे जाहिर आवाहन **पोलीस उप अधिक्षक बी.व्ही.गावडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद** यांनी केले आहे.

**मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९**

प्रति,

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

12/06/18

**(बी.व्ही.गावडे)**
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.

Scanned by CamScanner